दिनांक :    .१२.२०१९

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली**

**विषय : आंध्रप्रदेश सरकारने जेरुसलेम आणि हज यात्रांसाठी जाणाऱ्या भाविकांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्याचा घेतलेला निर्णय रहित करण्याविषयी ....**

महोदय,

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी नुकतीच हज आणि जेरूसलेम यात्रांना जाणाऱ्या भाविकांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ केली आहे. ज्यांचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा अल्प आहे, अशा मुसलमानांना हज यात्रेसाठी, तर अशा ख्रिस्त्यांना जेरुसलेम यात्रेसाठी यापूर्वी ४० सहस्र रुपये अनुदान मिळत असे. आता हे अनुदान ६० सहस्र रुपये करण्यात आले आहे. तर ज्यांचे उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांना यापूर्वी २० सहस्र रुपये अनुदान मिळत असे. आता त्यांना ३० सहस्र रुपये अनुदान दिले जाईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात १४ कोटी २२ लाख रुपयांची तरतूद केली आहे. राज्य सरकारचा हा निर्णय म्हणजे बहुसंख्यांक हिंदु करदात्यांच्या पैशातून अल्पसंख्यांकांच्या धार्मिक यात्रा घडवून आणल्या जात आहेत. हा निर्णय अल्पसंख्यांकांचे लांगुलचालन करणारा आणि बहुसंख्यांक हिंदु समाजावर घोर अन्याय करणारा आहे.

*** तरी या संदर्भात आम्ही आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की ....**

१. लोकशाही मार्गाने चालणाऱ्या आपल्या देशात 'धर्मनिरपेक्ष' व्यवस्था अंगिकारली आहे. याचाच अर्थ देशाची व्यवस्था ही कोणत्याही धार्मिक विचारसरणीवर आधारित नाही. असे असतांना आपल्या देशात अनेक निर्णय हे एका विशिष्ट धर्माच्या लोकांना सोयीचे व्हावेत, या दृष्टीने घेतले जात आहेत, हे दुर्दैवी आहे.

२. 'धर्मनिरपेक्ष' म्हणवल्या जाणाऱ्या या शासनप्रणालीत सर्व धर्मांना समान न्याय मिळावा, हे अपेक्षित असतांना तसे कुठेच होतांना दिसत नाही. मुसलमानांच्या हज यात्रेसाठी खास शासकीय स्तरांवरून नियोजन, वैद्यकीय सोयी-सुविधा, मार्गदर्शन केले जाते. त्यांना यात्रेसाठी सवलत दिली जाते, तर हिंदूंच्या कोणत्याच यात्रांना शासन कोणतीच सवलत देत नाही. उलट यात्रेवर विविध कारणे देत 'कर' लादत असते. कैलास मानसरोवर यात्रेसाठी जाणाऱ्या हिंदूंना २५ सहस्र रुपये हा कर द्यावा लागतो.

३. शासन जो काही पैसा खर्च करते, तो नागरिकांच्या कररूपातूनच गोळा झालेला असतो. असे आहे तर हिंदु करदाते शासनाला देत असलेल्या करातून केवळ मुसलमान आणि ख्रिस्ती यांनाच सवलत का ? हा एक प्रकारे बहुसंख्यांक हिंदूंवर अन्यायच आहे.

४. आंध्रप्रदेश रस्ते परिवहन महामंडळाने (आंध्रप्रदेश रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन) तिरुमला येथे जाण्यासाठी देण्यात येणाऱ्या बसच्या तिकीटामागे हज आणि जेरुसलेम यांचे विज्ञापन छापले होते. हे विज्ञापन सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाद्वारे छापण्यात आले होते. या प्रकरणी स्थानिक हिंदुत्ववाद्यांनी विरोध केल्यानंतर ती तिकीटे रहित करण्यात आली. तसेच अशा प्रकारची विज्ञापने छापलेली तिकीटे वितरित कशी झाली ?, याचा तपास करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. महत्त्वाचे म्हणजे तिरुमला क्षेत्रात अन्य पंथियांना प्रचार करण्यास कोणत्याही प्रकारची अनुमती नाही. असे असतांना बसच्या तिकिटावर अन्य पंथियांच्या प्रार्थनास्थळांचे विज्ञापन छापणे, हा गुन्हा केल्यासारखेच आहे.

५. आंध्रप्रदेश सरकारच्या अल्पसंख्यांक कल्याण मंत्रालयाच्या सचिवांनी २७ ऑगस्ट या दिवशी काढलेल्या एका आदेशात म्हटले आहे की, मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या वाय.एस्.आर्. काँग्रेस पक्षाच्या निवडणूक घोषणापत्रात राज्यातील चर्चच्या पाद्र्यांना मासिक ५ सहस्र रुपये मानधन देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. अशा प्रकारे पाद्र्यांना मानधन देऊन सरकार राज्यघटना आणि त्यातील समानता या दोन्ही सूत्रांचा अवमान करत आहे.

६. आंध्रप्रदेशाचे ख्रिस्ती मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी २५ लाख लोकांना घरे बांधून देण्याची घोषणा केली होती. याविषयीच्या योजनेसाठी त्यांनी मंदिरांची भूमी काही वर्षांच्या भाडेतत्त्वावर (लिजवर) मागितली होती. यासाठी त्यांनी नोटीस जारी करून प्रत्येक जिल्ह्यातील मंदिरांच्या भूमीची माहिती घेण्यास प्रशासनाला सांगितले होते. मुख्य सचिवांच्या माध्यमातून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना याविषयी नोटीस पाठवण्यात आली आहे. वास्तविक सरकारी योजनांसाठी मंदिरांच्या भूमीचा वापर करणे चुकीचे आहे, असा आदेश वर्ष २००६ मध्ये हैद्राबाद उच्च न्यायालयाने दिला होता, असे असतांना नियम धाब्यावर बसवून मंदिरांची जागा ताब्यात घेणे चुकीचे आहे.

७. सर्वोच्च न्यायालयाने वर्ष २०१२ मध्ये केंद्र सरकारला हज यात्रेसाठी देत असलेले अनुदान १० वर्षांत बंद करण्याचा निर्णय दिला होता. त्यामुळे आंध्रप्रदेश सरकारचा हा निर्णय म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय डावलून केवळ अल्पसंख्यांकांच्या लांगूलचालनासाठी घेतलेला निर्णय आहे आणि न्यायालयाचा अवमानच म्हणावा लागेल.

समाजातील सर्व घटकांना सर्व सुविधा समानतेने मिळायला हव्यात. धर्म, जात, पंथ, वर्ण, भाषा आदींनुसार सुविधा देणे, हे भेदभाव करण्यासारखेच होईल. लोकशाही मार्गाने चालणाऱ्या आपल्या देशाने धर्मनिरपेक्ष व्यवस्था अंगिकारली आहे. या शब्दातूनच आपली व्यवस्था ही कोणत्याही धार्मिक विचारसरणीवर आधारित नाही. असे असतांना आंध्रप्रदेशसारख्या राज्यात अनेक निर्णय हे एका विशिष्ट धर्माच्या लोकांना सोयीचे व्हावेत, या दृष्टीने घेतले जातात, हे दुर्दैवी आणि अत्यंत चुकीचे आहे.

८. अशा निर्णयामुळे देशाच्या घटनात्मक ढाचाला बाधा तर पोचतेच, तसेच हिंदूंच्या मनातही राज्यकर्ते केवळ अन्य धर्मियांच्या धर्मभावना जपतात आणि हिंदूंच्या बाबत धर्मनिरपेक्षता पाळतात, असा नकारात्मक संदेश जातो आणि तो देशाच्या एकात्मतेसाठी धोकादायक आहे.

त्यामुळे आंध्रप्रदेश सरकारने जेरुसलेम आणि हज येथे यात्रेसाठी जाणाऱ्या अल्प उत्पन्नधारकांना अनुदान देण्याचा निर्णय रहित करावा.

आपले विश्वासू,

संपर्क :

प्र
त

:

म
ा
न
न
ी
य

र
ा
ज
य
प
ा
ल